दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | सोमवार, दि. २४ मार्च, २०२६ | वर्ष - १ अंक - १७७ पाने - ४

पुणे/पिंपरी-चिंचवड

### आजचे पंचांग

सोमवार दि. २३ मार्च २०२६
*द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, चैत्र मास, शुक्लपक्ष, पंचमी संध्याकाळी ६-३९ पर्यंत नंतर षष्ठी तिथी, दिवस नक्षत्र- कृत्तिका रात्री ८-५० पर्यंत, चंद्र रास- वृषभ, सूर्य रास = मीन, गुरु रास= मिथुन

### भोंदूबाबा अशोक खरात अडचणीत

**नाशिक :** भोंदूबाबा अशोक खरात याच्याविरोधात लैंगिक शोषणाच्या आरोपांमध्ये वाढ होत असून आता त्याच्यावर तिसरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सरकारवाडा पोलिस ठाण्यात एका महिलेने धार्मिक विधी व भविष्य सांगण्याच्या नावाखाली शोषण केल्याची तक्रार केली आहे. याआधीही अनेक महिला पुढे आल्याने प्रकरण गंभीर बनले आहे. पोलिस चौकशीत खरात घाबरलेला दिसत असून त्याची अवस्था खालावल्याचे व्हिडिओ समोर आले आहेत.

## सारांश वृत्त

### प्रतिकूल हवामानाचा काजू उत्पादनाला फटका



**नवी दिल्ली :** प्रतिकूल हवामानामुळे यंदा देशातील काजू उत्पादनात ५० ते ६० टक्क्यांपर्यंत घट होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. अनियमित पाऊस, वाढलेली आर्द्रता, बुरशी आणि तापमानातील चढ-उतार यामुळे काजूच्या मोहोरावर परिणाम झाला. त्यातच आफ्रिकी देशांनी कच्च्या काजू निर्यातीवर निर्बंध लावल्याने प्रक्रिया उद्योग अडचणीत येणार आहे. महाराष्ट्रातील ४० टक्के उद्योगांवर याचा मोठा परिणाम होणार आहे. काजूच्या किमती वाढून दिवाळीपर्यंत १५०० रुपये किलोपर्यंत जाण्याचा अंदाज व्यक्त होत आहे.

### 'पवित्र' पोर्टलद्वारे शिक्षक भरती; पारदर्शकतेवर भर

**मुंबई :** राज्यातील जिल्हा परिषद व खासगी शिक्षण संस्थांमधील प्रलंबित शिक्षक भरती प्रक्रिया आता 'पवित्र' पोर्टलद्वारे राबवली जाणार आहे. शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल यांच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. भरतीत पारदर्शकता आणण्यासाठी खासगी संस्थांना रोस्टर प्रमाणित करूनच रिक्त पदांची नोंद करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या प्रक्रियेतून गुणवत्ताधारित निवड होऊन गैरप्रकारांना आळा बसणार असल्याने पात्र उमेदवारांना मोठा दिलासा मिळणार आहे.

### 'शत्रू देशांनाच बंद'... होर्मुझ सामुद्रधुनीवर इराणची भूमिका जाहीर

# इराणच्या निर्णयाने अमेरिकेला मोठा धक्का!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**तेहरान :** मध्यपूर्वेतील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर इराणने होर्मुझ सामुद्रधुनीबाबत महत्त्वाची भूमिका स्पष्ट करत जागतिक पातळीवर खळबळ उडवली आहे. इराणने जाहीर केले की, ही सामुद्रधुनी पूर्णतः बंद करण्यात आलेली नसून केवळ "शत्रू देशांशी संबंधित जहाजांनाच" या मार्गाचा वापर करण्यास मनाई असेल. इतर देशांच्या जहाजांसाठी हा मार्ग खुला राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

इराणचे आंतरराष्ट्रीय सागरी संघटनेतील प्रतिनिधी अली मौसावी यांनी ही भूमिका स्पष्ट करत सांगितले की, इराण सागरी सुरक्षेबाबत आंतरराष्ट्रीय सहकार्याला प्राधान्य देत आहे. मात्र, देशाच्या सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या राष्ट्रांशी संबंधित जहाजांना या मार्गावर निर्बंध घालणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. इराणची ही भूमिका ही केवळ सुरक्षा दृष्टीकोनातून घेतलेली असल्याचा दावा त्यांनी केला.

जगातील सर्वाधिक महत्त्वाच्या सागरी मार्गांपैकी एक असलेल्या होर्मुझ सामुद्रधुनीतून जागतिक स्तरावर सुमारे २० टक्के कच्चे तेल आणि नैसर्गिक वायूची वाहतूक होते. त्यामुळे या मार्गावरील कोणतीही हालचाल थेट जागतिक ऊर्जा बाजारावर परिणाम करणारी ठरते. इराणच्या या निर्णयामुळे आधीच अस्थिर असलेल्या ऊर्जा बाजारात आणखी अनिश्चितता निर्माण झाली आहे.

दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला ४८ तासांचा अल्टिमेटम देत सामुद्रधुनी पूर्णपणे खुली करण्याची मागणी केली होती. अन्यथा कठोर कारवाईचा इशारा दिला होता. या पार्श्वभूमीवर इराणने आपली भूमिका जाहीर करत एकप्रकारे अमेरिकेला प्रत्युत्तर दिल्याचे मानले जात आहे. दोन्ही देशांमधील वाढता तणाव जागतिक राजकारणातही मोठे परिणाम घडवू शकतो, अशी शक्यता तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे. या संघर्षाचा परिणाम केवळ राजकीय पातळीपुरता मर्यादित न राहता व्यापारी आणि सागरी वाहतुकीवरही होताना दिसत आहे. काही अहवालांनुसार, होर्मुझ सामुद्रधुनीमार्गे होणारी जहाजांची वाहतूक मोठ्या प्रमाणात घटली असून हजारो खलाशी विविध जहाजांवर अडकून पडल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार साखळीवरही ताण निर्माण झाला आहे.

भारतासारख्या देशांसाठी ही परिस्थिती अधिक चिंताजनक ठरत आहे. भारत मोठ्या प्रमाणावर कच्च्या तेलाच्या आयातीवर अवलंबून असल्याने होर्मुझ सामुद्रधुनीतील कोणताही अडथळा थेट देशाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम करू शकतो. इंधन दरवाढ, महागाईत वाढ आणि औद्योगिक उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

एकूणच, इराणच्या या निर्णयामुळे मध्यपूर्वेतील तणाव आणखी तीव्र झाला असून जागतिक ऊर्जा, व्यापार आणि राजकीय समीकरणांवर त्याचे दूरगामी परिणाम होण्याची चिन्हे आहेत. पुढील काही दिवसांत अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव कमी होतो की आणखी वाढतो, याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे.

# खरात प्रकरणात एसआयटीच्या तपासाला वेग; मंदिराचा पुजारी आणि सुरक्षारक्षकाची कसून चौकशी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नाशिक :** स्वयंघोषित ज्योतिषी अशोक खरात याच्याविरुद्ध बलात्कार, नरबळी आणि जादूटोण्याचा आरोप असलेल्या प्रकरणात रविवारी एसआयटीने नाशिकमधील ईशानेश्वर महादेव मंदिराचे पुजारी आणि एका सुरक्षारक्षकाची चौकशी केली. या कारवाईमुळे खरातच्या बाबतीतील अनेक धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. आयपीएस अधिकारी तेजस्वी सातपुते यांच्या नेतृत्वाखालील एसआयटीने या प्रकरणाचा तपास हाती घेतला आहे. शनिवारी खरातच्या कार्यालयातील कर्मचारी नीरज जाधव याची तब्बल सात तास चौकशी करण्यात आली होती.

त्यानंतर रविवारी तपास पथकाने आपला मोर्चा सिन्नर तालुक्यातील मिरगाव येथील ईशानेश्वर मंदिराकडे वळवला. येथील केअरटेकर पुजारी प्रमोद गडाख आणि एका सुरक्षारक्षकाचा चौकशी करण्यात आली .

अशोक खरातच्या अटकेनंतर तपासाची व्याप्ती वाढत गेली असून, खरातचे राजकीय संबंध आणि सिन्नरमधील जमिनीचे व्यवहार पोलीस खंखाळून पाहत आहेत.

तपासाचा भाग म्हणून पोलिसांनी खरातचे मिरगाव येथील फार्महाऊस, टिकडे कॉलनीतील बंगला आणि कॅनडा कॉर्नर येथील कार्यालयातील सीसीटीव्ही डीव्हीआर जप्त केले आहेत. खरातवर वावी, शिर्डी आणि सरकारवाडा पोलीस ठाण्यात खंडणी, ब्लॅकमेलिंग, बलात्कार आणि जादूटोण्याचे गंभीर गुन्हे दाखल आहेत.

# चाकणकरांवर गंभीर आरोप; सेक्स रॅकेट प्रकरणाने खळबळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडवणारे गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली ठोंबरे-पाटील यांनी केले आहेत. राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर या मोठ्या सेक्स रॅकेटच्या सूत्रधार असल्याचा आरोप त्यांनी फेसबुकवरील पत्रातून केला आहे. हे पत्र त्यांनी थेट मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवले आहे.

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात ऊर्फ 'कॅप्टन' प्रकरणात सापडलेल्या ५८ व्हिडिओंमुळे आधीच खळबळ उडाली आहे. या प्रकरणात आरोपी अशोक खरात याला अटक करण्यात आली असून २४ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. दरम्यान, या घडामोडींनंतर रुपाली चाकणकर यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेऊन आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे.

याच पार्श्वभूमीवर ठोंबरे-पाटील यांनी चाकणकरांवर गंभीर आरोप करत पदाचा गैरवापर, पोलिसांवर दबाव टाकणे तसेच भोंदूबाबाच्या गैरकृत्यांना पाठिंबा दिल्याचा दावा केला आहे.

या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान, या आरोपांवर संबंधितांकडून अधिकृत प्रतिक्रिया अद्याप आलेली नसून, प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

### राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांची माहिती

# हॉटेल, उपहारगृहांसाठी दिलासा! २० टक्के अतिरिक्त गॅस पुरवठा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** राज्यातील हॉटेल, ढाबे, उपहारगृहे तसेच औद्योगिक कॅन्टीन आणि अन्न प्रक्रिया-दुग्धव्यवसाय क्षेत्रासाठी दिलासादायक निर्णय घेत केंद्र शासनाने व्यापारी एलपीजी पुरवठ्यात २० टक्क्यांची वाढ केली आहे. याबाबत माहिती देताना राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी सांगितले की, या निर्णयामुळे गॅस टंचाईमुळे अडचणीत आलेल्या हॉटेल आणि उपहारगृह व्यावसायिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

केंद्र सरकारच्या पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या निर्देशानुसार, यापूर्वी राज्याला ३० टक्के एलपीजी वाटप मंजूर होते. मात्र, २३ मार्च २०२६ पासून पुढील आदेश येईपर्यंत या वाटपात आणखी २० टक्क्यांची वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे राज्यातील एकूण गॅस पुरवठा पूर्व-संकट पातळीच्या ५० टक्क्यांपर्यंत पोहोचणार आहे. यामुळे सध्या सुरू असलेल्या गॅस तुटवड्याच्या संकटावर काही प्रमाणात नियंत्रण मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या वाढीव वाटपात हॉटेल, ढाबे, उपहारगृहे, औद्योगिक कॅन्टीन, अन्न प्रक्रिया उद्योग तसेच दुग्धव्यवसाय यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. त्याचबरोबर राज्य शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांकडून चालविण्यात येणाऱ्या अनुदानित कॅन्टीन, कम्युनिटी किचन्स आणि स्थलांतरित मजुरांसाठीच्या अन्न योजनांनाही या निर्णयाचा थेट लाभ मिळणार आहे. त्यामुळे केवळ व्यावसायिक क्षेत्रालाच नव्हे तर सामाजिक घटकांनाही दिलासा मिळणार आहे.

मंत्री भुजबळ यांनी स्पष्ट केले की, या अतिरिक्त गॅस पुरवठ्याचा लाभ घेण्यासाठी संबंधित व्यावसायिकांनी तेल विपणन कंपन्यांकडे (OMCs) नोंदणी करणे आवश्यक आहे. तसेच पाइप्ड नॅचरल गॅस (PNG) साठी अर्ज करणेही बंधनकारक राहणार आहे. यामुळे गॅस वितरण अधिक पारदर्शक आणि नियोजनबद्ध पद्धतीने होण्यास मदत होईल, असेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, राज्यातील खाद्यव्यवसाय साखळीला गती देण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. गेल्या काही दिवसांत गॅस टंचाईमुळे अनेक हॉटेल व्यावसायिकांना व्यवसाय सुरळीत ठेवणे कठीण झाले होते. काही ठिकाणी तर हॉटेल बंद ठेवण्याची वेळही आली होती. अशा परिस्थितीत केंद्र आणि राज्य सरकारच्या संयुक्त प्रयत्नांमुळे दिलासा मिळाल्याचे व्यावसायिकांकडून सांगितले जात आहे. याचबरोबर केरोसिन वितरणाबाबतही राज्य सरकारने महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. प्रलंबित परवान्यांचे नूतनीकरण झालेले मानले जाणार असून त्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. तसेच परवाने वारसांच्या नावे तात्काळ वर्ग करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ज्या गावांमध्ये किरकोळ केरोसिन परवानाधारक उपलब्ध नाहीत, त्या ठिकाणी रास्तभाव दुकानांना परवाना देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

### ३ महिने काळ्या कोटातून वकिलांना सूट; १५ जूनपर्यंत सवलत

# वाढत्या उष्णतेमुळे उन्हाळ्यात वकिलांना दिलासा!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे वकिलांना दिलासा देणारा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. न्यायालयीन कामकाजादरम्यान परिधान कराव्या लागणाऱ्या पारंपरिक काळ्या कोटापासून वकिलांना १५ मार्च ते १५ जून या कालावधीत तात्पुरती सूट देण्यात आली आहे. या तीन महिन्यांत वकिलांना काळा कोट घालणे बंधनकारक राहणार नसल्याने त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

उन्हाळ्यात तापमानात झपाट्याने वाढ होत असल्याने काळ्या रंगाच्या कोटामुळे उष्णता अधिक जाणवते. परिणामी, न्यायालयात दीर्घकाळ काम करताना वकिलांना थकवा, घाम आणि अस्वस्थता सहन करावी लागते. विशेषतः जुन्या इमारतीतील किंवा ग्रामीण भागातील न्यायालयांमध्ये थंडाव्याच्या सुविधा मर्यादित असल्याने परिस्थिती आणखी गंभीर होते.

ग्रामीण न्यायालयांमध्ये अनेक ठिकाणी पंखे, कुलर किंवा वातानुकूलनाची सुविधा अपुरी असते. त्यामुळे उकाड्यात दीर्घकाळ उभे राहून किंवा बसून काम करणे वकिलांसाठी आव्हानात्मक ठरते. यामुळे आरोग्यावरही परिणाम होण्याची शक्यता असते. या पार्श्वभूमीवर ही सवलत अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे मानले जात आहे.

काळा कोट हा वकिलांच्या ओळखीचा आणि परंपरेचा अविभाज्य भाग आहे. न्यायालयीन शिस्त आणि व्यावसायिक ओळख टिकवून ठेवण्यासाठी त्याला विशेष महत्त्व आहे. मात्र, आरोग्य आणि कामकाज सुलभ व्हावे या उद्देशाने दरवर्षी उन्हाळ्यात अशा प्रकारची तात्पुरती सूट दिली जाते.


या निर्णयामुळे वकिलांना अधिक आरामदायी वातावरणात काम करता येणार असून उष्णतेमुळे होणारा त्रास कमी होईल. न्यायालयीन कामकाजही अधिक सुरळीत पार पडण्यास मदत होणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### महिला आयोग अध्यक्षपदावर ज्योती मेटे यांची चर्चा जोरात

**मुंबई :** राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा रुपाली चाकणकर यांच्या राजीनाम्यानंतर रिक्त झालेल्या जागेसाठी नव्या नावांची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. ज्योती मेटे यांचे नाव आघाडीवर असल्याचे बोलले जात आहे. स्वर्गीय विनायकराव मेटे यांच्या सामाजिक व मराठा आरक्षण चळवळीतील मोठ्या योगदानामुळे त्यांच्या वारसदार म्हणून ज्योती मेटे यांना संधी द्यावी, अशी मागणी होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून या नियुक्तीतून योग्य निर्णय घेतला जाईल का, याकडे राजकीय व सामाजिक वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# सिद्धिविनायक मंदिर मध्ये चोरी; कर्मचाऱ्याचाच सहभाग उघड

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** प्रभादेवी येथील प्रसिद्ध सिद्धिविनायक मंदिरात चोरीची घटना उघडकीस आल्यानंतर शहरात मोठी खळबळ उडाली आहे. लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या या मंदिरातच असा प्रकार घडल्याने सर्वत्र आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

मंदिरातील पुजारी कक्षात ठेवलेल्या दानपेटीतून सुमारे १० हजार रुपयांची रक्कम गायब झाल्याचे लक्षात आल्यानंतर मंदिर प्रशासनाने तातडीने पोलिसांकडे तक्रार दाखल केली. घटनेची गंभीर दखल घेत पोलिसांनी तपास सुरू केला. तपासादरम्यान सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता धक्कादायक बाब समोर आली. मंदिरातीलच एका कर्मचाऱ्याने दानपेटीतून पैसे चोरल्याचे स्पष्ट झाले. संबंधित कर्मचारी बोटाच्या आकाराच्या कैचीचा वापर करून चलाखीने रक्कम काढताना कॅमेऱ्यात कैद झाला आहे. या ठोस पुराव्यांच्या आधारे पोलिसांनी आरोपी कर्मचाऱ्याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने गुन्ह्याची कबुली दिल्याची माहिती समोर आली आहे. न्यायालयाने त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असून पुढील तपास सुरू आहे.

सुरक्षेच्या कारणास्तव आरोपीचे नाव अद्याप जाहीर करण्यात आलेले नाही. दरम्यान, या घटनेमुळे मंदिराच्या सुरक्षाव्यवस्थेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. भाविकांच्या श्रद्धेचे रक्षण करण्यासाठी आणि अशा घटना टाळण्यासाठी अधिक कडक उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

### गुढी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर दै. राज्य लोकतंत्रच्या मराठवाडा आवृत्तीला यशस्वी 5 वर्षे पूर्ण

# दै. राज्य लोकतंत्रचा 5 वा वर्धापन दिन बीडमध्ये उत्साहात साजरा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**बीड :** अत्यंत कमी कालावधीत वाचकांच्या मनात स्थान निर्माण करत वेगाने प्रगती साधलेल्या दै. राज्य लोकतंत्र या दैनिकाच्या मराठवाडा आवृत्तीचा 5 वा वर्धापन दिन गुढी पाडव्याच्या शुभदिनी, दिनांक 19 मार्च रोजी बीड येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

शहरातील प्रसिद्ध हॉटेल ग्रँड यशोदा येथे सायंकाळी आयोजित करण्यात आलेल्या चहापान कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर, लोकप्रतिनिधी, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सोहळ्याला विशेष रंगत आणली. उपस्थितांनी दैनिकाच्या यशस्वी वाटचालीबद्दल कौतुक करत पुढील यशासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला.

शेतकरी आणि सामान्य जनतेचा विश्वास जिंकलेले दैनिक

दै. राज्य लोकतंत्र हे अल्पावधीतच शेतकरी आणि सामान्य जनतेच्या पसंतीस उतरलेले दैनिक म्हणून ओळखले जाते. शेतकऱ्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देत, त्यांच्या अडचणी, समस्या आणि यशोगाथा यांना माध्यमातून मांडण्याचे काम या दैनिकाने सातत्याने केले आहे.

मराठवाडा विभागात व्यापक प्रसार असलेल्या या दैनिकाच्या पुणे येथूनही स्वतंत्र आवृत्ती प्रकाशित केली जाते. वाचकांच्या विश्वासावर आधारित या दैनिकाने आपली विश्वासार्हता आणि लोकप्रियता सातत्याने वाढवली आहे. याशिवाय विविध क्षेत्रातील मान्यवर, ज्येष्ठ पत्रकार, संपादक, डॉक्टर, वकील, अभियंते आणि सामाजिक कार्यकर्ते यांनी देखील या कार्यक्रमात सहभाग घेतला. उपस्थितांनी दैनिकाच्या संपादकीय भूमिकेचे कौतुक करत त्याच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

**दूरध्वनीद्वारेही मान्यवरांचे अभिनंदन**

कार्यक्रमाला प्रत्यक्ष उपस्थित राहू न शकलेल्या अनेक मान्यवरांनी दूरध्वनीद्वारे शुभेच्छा दिल्या. यामध्ये राज्याच्या पर्यावरण व पालकमंत्री पंकजाताई मुंडे, जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई अजित पवार, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, धनंजय मुंडे, आमदार विक्रम काळे, तसेच इतर अनेक नेत्यांचा समावेश होता.

या सर्व मान्यवरांनी दै. राज्य लोकतंत्रच्या टीमला पुढील यशासाठी शुभेच्छा देत, त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

**संपादकीय टीमचे योगदान**

या यशामागे दै. राज्य लोकतंत्रचे संपादक संचालक गणेश मोकाशे, कार्यकारी संपादक सुभाष चौरे, मुख्य उपसंपादक अनिल जाधव, उपसंपादक विशाल साळुंके आणि व्यवस्थापक दिलीप शिंगाडे यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली दैनिकाने वाचकांचा विश्वास संपादन केला आहे. कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी या सर्व टीम सदस्यांचे विशेष अभिनंदन केले.

**समारोप आणि पुढील वाटचाल**

या भव्य सोहळ्यात सर्व उपस्थितांनी दै. राज्य लोकतंत्रच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. वाचकांसाठी अधिक विश्वासार्ह, वस्तुनिष्ठ आणि समाजाभिमुख पत्रकारिता करण्याचा संकल्प या निमित्ताने व्यक्त करण्यात आला. अल्पावधीतच मोठे यश मिळवलेल्या दै. राज्य लोकतंत्रने आपली वेगळी ओळख निर्माण केली असून, भविष्यातही याच विश्वासावर समाजाच्या प्रश्नांना वाचा फोडत राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

### मान्यवरांची उपस्थिती आणि शुभेच्छांचा वर्षाव

● या वर्धापन दिन कार्यक्रमाला अनेक नामांकित मान्यवरांनी उपस्थित राहून दै. राज्य लोकतंत्रच्या टीमचे अभिनंदन केले. बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे, आमदार संदीप क्षीरसागर, आमदार विजयसिंह पंडित, तसेच अनेक सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## संपादकीय

### शहरांच्या सक्षमीकरणातूनच उज्ज्वल भविष्याची वाट”

**भारताला 2047 पर्यंत ‘विकसित राष्ट्र’ बनवण्याचे स्वप्न केवळ एक उद्दिष्ट नाही, तर ते संपूर्ण देशाच्या भविष्यासाठी दिशा ठरवणारे ध्येय आहे. या प्रवासाची खरी सुरुवात आपल्या शहरांपासूनच होते, हा विचार सध्या अधिक ठळकपणे पुढे येत आहे.**

माजी कॅबिनेट सचिव राजीव गौबा यांनी अलीकडे मांडलेले निरीक्षण याच दिशेने लक्ष वेधते. त्यांच्या मते, भारताच्या शहरी जीवनाचे पुनरुज्जीवन केल्याशिवाय देशाच्या सर्वांगीण विकासाला गती मिळू शकत नाही. आज भारत झपाट्याने शहरीकरणाकडे वाटचाल करत आहे. येत्या काही दशकांत देशातील निम्म्याहून अधिक लोकसंख्या शहरांमध्ये राहणार आहे. ही वाढती शहरी लोकसंख्या केवळ संधी निर्माण करत नाही, तर अनेक आव्हानेही उभी करते. शहरांचे योग्य नियोजन, पायाभूत सुविधांचा विकास आणि कार्यक्षम प्रशासन या तिन्ही बाबी अधिक सक्षम केल्या नाहीत, तर शहरी विकासाचा समतोल ढासळण्याचा धोका आहे.

भारतातील अनेक शहरे अजूनही सुनियोजित पद्धतीने विकसित झालेली नाहीत. अनियंत्रित नागरी विस्तार, झोपडपट्ट्यांची वाढ आणि मूलभूत सुविधांची कमतरता ही आजची मोठी समस्या आहे. ग्रामीण भागातून शहरांकडे होणारे स्थलांतर मोठ्या प्रमाणात वाढले आहे. मात्र या वाढत्या लोकसंख्येला सामावून घेण्यासाठी आवश्यक असलेले पायाभूत नियोजन अपुरे पडते. रस्ते, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, वाहतूक आणि स्वच्छता यांसारख्या मूलभूत सेवांवर प्रचंड ताण येतो. परिणामी, शहरांमध्ये वाहतूक कोंडी, अस्वच्छता, प्रदूषण आणि बेकायदेशीर बांधकामे यांचे प्रमाण वाढते. सुनियोजित विकासाच्या अभावामुळे शहरांचा चेहराच बिघडतो, आणि नागरिकांच्या जीवनमानावर त्याचा थेट परिणाम होतो. शहरांच्या विकासातील एक मोठी अडचण म्हणजे त्यांची आर्थिक स्वायत्तता. बहुतांश स्थानिक स्वराज्य संस्थांचे उत्पन्न प्रामुख्याने मालमत्ता करावर अवलंबून असते. मात्र या कराची प्रभावी वसुली होत नाही. अनेकदा राजकीय दबावामुळे करमाफी किंवा सवलती दिल्या जातात, ज्यामुळे शहरांच्या आर्थिक स्रोतांवर परिणाम होतो. राजीव गौबा यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, स्थानिक संस्थांना आर्थिक बळ दिल्याशिवाय शहरांचा विकास शक्य नाही. केंद्र आणि राज्य सरकारांकडून मिळणाऱ्या निधीचा वापर अनेकदा योग्य प्रकारे होत नाही, किंवा त्यात पारदर्शकतेचा अभाव दिसून येतो. त्यामुळे शहरांना स्वतःचे उत्पन्न निर्माण करण्याची क्षमता वाढवणे अत्यंत गरजेचे आहे. सध्याच्या शहरी प्रशासन व्यवस्थेत महापौर, आयुक्त आणि राज्य सरकार यांच्यात अधिकारांची विभागणी झालेली आहे. यामुळे अनेकदा निर्णय प्रक्रियेत विलंब होतो आणि जबाबदारी निश्चित होत नाही. महापौरांकडे अधिकार नसतात, तर प्रशासकीय यंत्रणेवर स्पष्ट उत्तरदायित्व नसते. या विस्कळीत व्यवस्थेमुळे नागरिकांच्या तक्रारी तशाच राहतात. स्वच्छता, पाणीपुरवठा, वाहतूक यांसारख्या मूलभूत सेवांबाबत नागरिकांना समाधान मिळत नाही. परिणामी, प्रशासनावरील विश्वास कमी होतो आणि नागरिकांमध्ये नाराजी वाढते.

राजीव गौबा यांनी शहरी विकासासाठी काही महत्त्वाच्या सुधारणा सुचवल्या आहेत. या सुधारणा भारताच्या शहरांना भविष्यात सक्षम बनवू शकतात. प्रथम, सशक्त महापौर व्यवस्था आवश्यक आहे. शहरांचा कारभार अधिक गतिमान आणि परिणामकारक करण्यासाठी महापौरांना ठोस अधिकार देणे गरजेचे आहे. निर्णय घेण्याची क्षमता स्थानिक पातळीवर असावी, जेणेकरून समस्या जलदगतीने सोडवता येतील. दुसरे म्हणजे आर्थिक स्वायत्तता. स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वतःचे उत्पन्न वाढवण्याची संधी मिळाली पाहिजे. कर वसुली सुधारली, तर शहरांना स्वतःच्या विकासासाठी निधी उपलब्ध होऊ शकतो. तिसरे म्हणजे प्रादेशिक नियोजन. केवळ शहरापुरता विचार न करता संपूर्ण प्रदेशाचा विचार करून विकास आराखडा तयार केला पाहिजे. यामुळे असमतोल विकास टाळता येईल. चौथे म्हणजे नागरिकांचा सहभाग. शहरांच्या नियोजनात नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढवणे आवश्यक आहे. नागरिकांच्या सूचनांमुळे योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावी होऊ शकते. पाचवे म्हणजे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर. स्मार्ट सिटी संकल्पना, डिजिटल गव्हर्नन्स, आणि डेटा-आधारित नियोजन यांचा वापर करून शहरांचा कारभार अधिक पारदर्शक आणि कार्यक्षम बनवता येतो. केंद्र सरकारने स्मार्ट सिटी मिशन, अमृत योजना आणि स्वच्छ भारत अभियान यांसारख्या अनेक उपक्रमांद्वारे शहरी विकासाला चालना दिली आहे. या योजनांमुळे काही शहरांमध्ये सकारात्मक बदल दिसून आले आहेत. मात्र, या योजनांचा पूर्ण फायदा मिळवण्यासाठी त्यांची अंमलबजावणी अधिक प्रभावी होणे गरजेचे आहे. पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक वाहतूक आणि परवडणारी घरे या गोष्टींवर विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. शहरांमध्ये राहणीमान सुधारण्यासाठी या पायाभूत सुविधांचा दर्जा वाढवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शहरांचा विकास हा केवळ सरकारची जबाबदारी नाही, तर नागरिकांचीही आहे. स्वच्छता राखणे, वेळेवर कर भरणा करणे, आणि नियमांचे पालन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. प्रशासन आणि नागरिक यांच्यात समन्वय निर्माण झाल्यास शहर अधिक सुसंगत आणि सक्षम बनते. नागरिकांचा सहभाग वाढवण्यासाठी पारदर्शकता आणि संवाद महत्त्वाचे आहे. जर नागरिकांना प्रशासनावर विश्वास वाटला, तर ते विकास प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेतील. भारत 2047 पर्यंत विकसित राष्ट्र होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.

# ‘उमेद’च्या साथीने ‘अन्नपूर्णा फूड अ‍ॅण्ड प्रॉडक्ट्स’ची प्रेरणादायी घौडदौड



**» ग्रामीण भागातील महिलांमध्ये असलेली क्षमता योग्य मार्गदर्शन, आर्थिक पाठबळ आणि संधी यांच्या माध्यमातून उजागर झाली, तर त्या केवळ स्वतःचा नाही तर संपूर्ण समाजाचा चेहरामोहरा बदलू शकतात. याचे जिवंत उदाहरण म्हणजे नांदेड जिल्ह्यातील भोकर तालुक्यातील रेणापूर येथील सुनीता अशोक कावळे.**

‘उमेद’ (एमएसआरएलएम) अभियानाच्या मदतीने त्यांनी उभा केलेला ‘अन्नपूर्णा फूड अ‍ॅण्ड प्रॉडक्ट्स’ हा उद्योग आज अनेकांसाठी प्रेरणास्थान ठरत आहे.

सुनीता कावळे यांचा प्रवास अत्यंत साध्या परिस्थितीतून सुरू झाला. शिक्षण दहावीपर्यंतच झालेले, व्यवसायाची कोणतीही पार्श्वभूमी नसलेली आणि आर्थिक पाठबळाचा पूर्ण अभाव असलेली ही महिला आज लाखो रुपयांची उलाढाल करणारी यशस्वी उद्योजिका बनली आहे. त्यांच्या यशामागे प्रचंड जिद्द, चिकाटी आणि स्वतःवर असलेला विश्वास हेच खरे भांडवल आहे.

२०१७ साली त्यांनी केवळ ५०० रुपयांच्या भांडवलावर छोट्या स्वरूपात व्यवसायाची सुरुवात केली. गावात सहज उपलब्ध होणाऱ्या आवळ्यापासून विविध खाद्यपदार्थ तयार करण्याची कल्पना त्यांनी प्रत्यक्षात उतरवली. आवळा कँडी, मुरंबा, लोणचे, चूर्ण अशा विविध उत्पादनांची निर्मिती त्यांनी स्वतःच्या हाताने सुरू केली. सुरुवातीच्या काळात कच्चा माल मिळवण्यासाठी त्यांना ५०-६० किलोमीटरपर्यंत प्रवास करावा लागत असे. उत्पादन तयार करण्यापासून ते विक्रीपर्यंतची संपूर्ण जबाबदारी त्यांनी एकहाती सांभाळली.

या प्रवासात त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. कुटुंबातूनही अपेक्षित पाठिंबा मिळाला नाही, तर काहींनी त्यांच्या प्रयत्नांची थट्टाही केली. “हे तुमच्याने होणार नाही” असे म्हणणाऱ्यांची संख्या जास्त होती. मात्र त्यांच्या मुलींनी दिलेला आधार आणि प्रोत्साहन हे त्यांच्यासाठी प्रेरणादायी ठरले. त्यांनी कोणत्याही नकारात्मकतेकडे दुर्लक्ष करून आपल्या ध्येयाकडे वाटचाल सुरू ठेवली.

२०१९ मध्ये सुनीता ‘उमेद’ अभियानाशी जोडल्या गेल्या आणि त्यांच्या आयुष्याला एक नवे वळण मिळाले. या माध्यमातून त्यांना व्यवसाय व्यवस्थापन, ब्रँडिंग, पॅकेजिंग आणि मार्केटिंग याबाबत प्रशिक्षण मिळाले. या प्रशिक्षणामुळे त्यांच्या उत्पादनांना व्यावसायिक रूप प्राप्त झाले. ‘अन्नपूर्णा फूड अ‍ॅण्ड प्रॉडक्ट्स’ या नावाने त्यांनी आपल्या व्यवसायाला ओळख मिळवून दिली.

ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून आयोजित ‘महालक्ष्मी सरस’ प्रदर्शनात सहभाग घेतल्याने त्यांच्या व्यवसायाला मोठी चालना मिळाली. या प्रदर्शनात त्यांच्या उत्पादनांना ग्राहकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला. विशेष म्हणजे या एका प्रदर्शनात त्यांनी तब्बल १२ लाख रुपयांची विक्री केली. एका छोट्या गावातून सुरू झालेल्या व्यवसायासाठी हा टप्पा अत्यंत महत्त्वाचा होता. यामुळे त्यांच्या आत्मविश्वासात मोठी भर पडली आणि मोठ्या बाजारपेठेची दारे त्यांच्या समोर खुली झाली.

आज ‘अन्नपूर्णा फूड अ‍ॅण्ड प्रॉडक्ट्स’ अंतर्गत त्या आवळ्याचे ११ प्रकारचे पदार्थ तयार करतात आणि त्यांची वार्षिक उलाढाल सुमारे ९ लाख रुपयांपर्यंत पोहोचली आहे. त्यांच्या उत्पादनांना स्थानिक बाजारपेठेसोबतच इतर भागातूनही मागणी वाढत आहे. गुणवत्ता आणि आरोग्यदायी उत्पादने हेच त्यांच्या यशाचे प्रमुख सूत्र ठरले आहे. व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी सुनीता शासकीय योजनांचा लाभ घेत आहेत. पीएमएफएमई (PMFME) योजनेअंतर्गत मशिनरी, पॅकेजिंग युनिट आणि इतर आवश्यक सुविधांसाठी त्यांनी प्रक्रिया सुरू केली आहे. यामुळे त्यांचा व्यवसाय अधिक आधुनिक आणि स्पर्धात्मक होण्याची शक्यता आहे. भविष्यात ‘अन्नपूर्णा’ हा ब्रँड संपूर्ण भारतभर पोहोचवण्याचा त्यांचा संकल्प आहे. सुनीता यांची एक विशेष बाब म्हणजे त्यांनी केवळ स्वतःपुरते यश मर्यादित ठेवले नाही. इतर महिलांनाही स्वावलंबी बनवण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला आहे. विशेषतः विधवा, परित्यक्ता आणि गरजू महिलांना त्यांनी मार्गदर्शन केले आणि त्यांच्या हाताला काम दिले. “एक महिला सक्षम झाली, तर ती अनेकांना सक्षम करू शकते” या विचारातून त्या काम करत आहेत.

त्यांच्यासाठी ‘अन्नपूर्णा’ हा फक्त एक व्यवसाय नसून महिलांच्या सशक्तीकरणाचे एक व्यासपीठ आहे. त्यांनी स्वतः अनुभवलेल्या संघर्षातून शिकत इतर महिलांसाठी संधी निर्माण केल्या आहेत. त्यांच्या या कार्यामुळे अनेक महिलांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडत आहेत.

सुनीता कावळे यांचा प्रवास हा ग्रामीण महिलांसाठी प्रेरणादायी आदर्श आहे. आर्थिक आणि शैक्षणिक अडचणी असूनही जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर त्यांनी यशाचा शिखर गाठले. ‘उमेद’ अभियानासारख्या उपक्रमांच्या मदतीने महिलांना योग्य दिशा मिळाल्यास त्या कोणत्याही क्षेत्रात मोठी कामगिरी करू शकतात, हे त्यांनी सिद्ध करून दाखवले आहे.

आज ‘अन्नपूर्णा फूड अ‍ॅण्ड प्रॉडक्ट्स’ हा केवळ एक उद्योग नसून संघर्ष, आत्मविश्वास आणि यशाची कहाणी बनला आहे. सुनीता कावळे यांची ही घौडदौड निश्चितच इतरांना प्रेरणा देणारी ठरणार आहे.

# बोरीवलीत मिलेट महोत्सवाचा शुभारंभ; राज्यभर विस्ताराचा निर्धार

## पौष्टिक तृणधान्यांना प्रोत्साहन देण्यासाठी पुढाकार – पणन मंत्री जयकुमार रावल

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मुंबई :** ज्वारी, बाजरी, नाचणी यांसारख्या पौष्टिक तृणधान्यांना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने बोरीवली येथे तीन दिवसीय मिलेट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. बोरीवली पश्चिम येथील कोरा केंद्र मैदानावर आयोजित या महोत्सवाचे उद्घाटन पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते झाले. २२ मार्च २०२६ पर्यंत हा महोत्सव नागरिकांसाठी खुला राहणार आहे.

यावेळी आमदार मनीषा चौधरी, नगरसेवक शिवानंद शेट्टी, कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे आदी उपस्थित होते. महोत्सवात राज्यभरातील उत्पादक, प्रक्रियादार आणि नवउद्योजकांनी सहभाग नोंदवला असून विविध मिलेट उत्पादनांचे प्रदर्शन व विक्री येथे होत आहे. मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले की, मिलेट्स ही कमी पाण्यावर येणारी, पर्यावरणपूरक आणि आरोग्यासाठी अत्यंत लाभदायक पिके आहेत. बदलत्या जीवनशैलीमुळे वाढणाऱ्या स्थूलपणा, मधुमेह, उच्च रक्तदाब यांसारख्या आजारांवर मिलेट्स प्रभावी उपाय ठरू शकतात. त्यामुळे शेतातून थेट ग्राहकांपर्यंत मिलेट उत्पादने पोहोचवण्यासाठी अशा महोत्सवांची गरज आहेप्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारातून २०२३ हे वर्ष ‘आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष’ म्हणून साजरे करण्यात आले होते. त्याच धर्तीवर राज्यात ‘महाराष्ट्र श्री अन्न (मिलेट) अभियान’ राबवले जात असून, मिलेट्सविषयी जागरूकता वाढवण्यावर भर दिला जात आहे. तसेच संयुक्त राष्ट्रांनी २०२६ हे वर्ष ‘आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष’ घोषित केल्याने महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणालाही चालना मिळणार आहे. मॅग्नेट प्रकल्पांतर्गत तृणधान्यांसह विविध कृषी उत्पादनांची एकात्मिक मूल्य साखळी विकसित करण्याचे प्रयत्न सुरू असून, उत्पादनापासून विक्रीपर्यंत शाश्वत व्यवस्था उभी करण्यावर भर दिला जात आहे.

पुण्यातील यशस्वी आयोजनानंतर यंदा मुंबईत महोत्सव भरवण्यात आला असून, पुढील काळात पुणे, कोल्हापूर, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती आणि लातूर येथेही मिलेट महोत्सव आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती रावल यांनी दिली. नागरिकांनी या महोत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# ‘युवोन्मेश’ मैफिले; रसिक मंत्रमुग्ध

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पंडित जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सवातील ‘युवोन्मेश’ या युवा कलाकारांच्या विशेष मैफिलीने रसिकांना मंत्रमुग्ध केले. शास्त्रीय गायन, पखवाज वादनाची जुगलबंदी आणि सुरेल सादरीकरणांनी सभागृहात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी सकाळच्या सत्राची सुरुवात डॉ. शर्वरी डिग्रजकर-पोफळे यांच्या गायनाने झाली. त्यांनी राग गुजरी तोडीतील विलंबित ख्याल आणि द्रुत बंदिश सादर करत रसिकांची मने जिंकली. त्यांना गीत इनामदार, उमेश पुरोहित (तबला) आणि सुकन्या जोशी (तानपुरा) यांनी साथ दिली. “या प्रतिष्ठित मंचावर सादरीकरणाची संधी मिळणे हे माझे भाग्य,” असे त्यांनी सांगितले. यानंतर पखवाज वादक पार्थ भूमकर आणि प्रथमेश तारळकर यांच्या दमदार जुगलबंदीने कार्यक्रमाला वेगळीच रंगत आणली. त्यांच्या प्रभावी सादरीकरणाने सभागृहात दाद मिळाली. शेवटच्या सत्रात आसामच्या श्रुती बुजरबारूआ यांनी राग शुद्ध सारंग सादर करत रसिकांची मने जिंकली. पार्थ ताराबादकर (तबला) आणि सौमित्र क्षीरसागर (संवादिनी) यांनी त्यांना साथ दिली. युवा कलाकारांच्या दर्जेदार सादरीकरणामुळे ‘युवोन्मेश’ मैफिलीने महोत्सवात विशेष रंग भरला. होत्सवाच्या शेवटच्या सत्रात आसामच्या गायिका श्रुती बुजरबारूआ यांनी अप्रतिम गायन सादर केले. त्यांनी राग शुद्ध सारंगमध्ये ‘धरणी धरोहर’ ही रूपक मध्य तालातील बंदिश सादर करत रसिकांची मने जिंकली. त्यांच्या सादरीकरणाला पार्थ ताराबादकर (तबला) आणि सौमित्र क्षीरसागर (संवादिनी) यांनी समर्थ साथ दिली.

# केंद्र प्रमुख स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण उमेदवारांना दिलासा

## माहिती भरण्यास ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्र प्रमुख) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०२५ मध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांसाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून महत्त्वाचा दिलासा देण्यात आला आहे. उमेदवारांना महाटीइटी किंवा सीटीइटी उत्तीर्ण असल्याची माहिती भरण्यासाठी ३१ मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

पुणे येथील महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून या परीक्षेचा निकाल १३ मार्च २०२६ रोजी अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला होता. या परीक्षेत सहभागी झालेल्या उमेदवारांना महाटीइटी किंवा सीटीइटी उत्तीर्ण झाल्याची माहिती भरण्यासाठी यापूर्वी १६ ते २१ मार्च दरम्यानची मुदत देण्यात आली होती. मात्र अनेक उमेदवारांकडून मुदतवाढीची मागणी करण्यात आल्यानंतर परिषदेकडून ही मुदत २२ मार्च ते ३१ मार्चपर्यंत वाढवण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार जिल्हा परिषदांमध्ये कार्यरत प्राथमिक शिक्षकांना केंद्र प्रमुख पदावर नियुक्त करण्यासाठी ही विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षा घेण्यात आली होती. ही परीक्षा ३ ते ४ फेब्रुवारी २०२६ दरम्यान तीन सत्रांत ऑनलाइन पद्धतीने पार पडली. या परीक्षेसाठी एकूण ४६,०६८ उमेदवारांनी अर्ज केला होता, त्यापैकी ३८,५५९ उमेदवारांनी प्रत्यक्ष परीक्षेला हजेरी लावली. परीक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांनी आवश्यक माहिती निर्धारित लिंकवर जाऊन वेळेत भरावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेडसे यांनी केले आहे. तसेच दिलेल्या मुदतीत माहिती न भरल्यास पुढील प्रक्रियेत अडचणी निर्माण होऊ शकतात, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. या निर्णयामुळे अनेक उमेदवारांना दिलासा मिळाला असून, अंतिम निवड प्रक्रियेसाठी आवश्यक कागदपत्रे सादर करण्यासाठी अधिक वेळ उपलब्ध झाला आहे.

## नवी दिल्लीत ११-१२ एप्रिलला पहिले अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

# महिला शासकीय अधिकाऱ्यांच्या साहित्य संमेलनाध्यक्षपदी लीना मेहेंदळे

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** महिला शासकीय अधिकाऱ्यांच्या पहिल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवृत्त सनदी अधिकारी लीना मेहेंदळे यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. संमेलनाच्या निमंत्रक आर. विमला आणि स्वागताध्यक्ष सुप्रिया देवस्थळी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही घोषणा केली.

सरहद संस्था, पुणे आणि नवीन महाराष्ट्र सदन यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच मराठी भाषा विभागाच्या सहकार्याने हे दोन दिवसीय संमेलन ११ व १२ एप्रिल २०२६ रोजी नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्नुषा आणि छत्रपती राजाराम महाराज यांच्या पत्नी महाराणी ताराराणी यांच्या ३५१ व्या जयंतीनिमित्त या संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून, त्याला विशेष ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व प्राप्त झाले आहे. लीना मेहेंदळे या भारतीय प्रशासकीय सेवेच्या १९७४ बॅचच्या अधिकारी असून त्यांचा जन्म जळगाव जिल्ह्यातील धरणगाव येथे झाला. त्यांनी महाराष्ट्र राज्याच्या अतिरिक्त मुख्य सचिव (सामान्य प्रशासन) या महत्त्वपूर्ण पदावरून निवृत्ती घेतली आहे. तसेच गोवा राज्याच्या मुख्य माहिती अधिकारी पदाची जबाबदारीही त्यांनी यशस्वीपणे सांभाळली आहे. प्रशासकीय कारकिर्दीत महसूल, प्रशासन, कायद्याची अंमलबजावणी, विकास प्रशासन आणि कार्यालयीन कामकाजात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर यांसारख्या अनेक महत्त्वाच्या विषयांवर त्यांनी काम केले आहे. राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर विविध जबाबदाऱ्या पार पाडताना त्यांनी प्रभावी नेतृत्व आणि दूरदृष्टीचे दर्शन घडवले आहे.

साहित्य क्षेत्रातही त्यांचे योगदान लक्षणीय आहे. विविध विषयांवर त्यांनी ५०० हून अधिक लेख लिहिले असून २४ पुस्तके प्रकाशित केली आहेत. यामध्ये १९ अनुवादित पुस्तकांचा समावेश आहे. कवी कुसुमाग्रज यांच्या कवितांचा हिंदीत अनुवाद करण्याबरोबरच त्यांनी मराठी नाटक आणि कादंबरीचेही अनुवाद केले आहेत. ‘द लास्ट पास’ ही इंग्रजी कादंबरी त्यांनी मराठीत सादर केली आहे. तसेच लहान मुलांसाठीही त्यांनी लेखन केले आहे. पक्षीनिरीक्षण, निसर्गोपचार आणि प्रशासकीय सुधारणा हे त्यांचे आवडते विषय असून संगीताचीही त्यांना विशेष आवड आहे. त्यांच्या बहुआयामी कार्याचा गौरव म्हणून त्यांची या संमेलनाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

या संमेलनाच्या माध्यमातून देशभरातील महिला शासकीय अधिकाऱ्यांना साहित्यिक अभिव्यक्तीचे व्यासपीठ मिळणार असून, मराठी भाषेचा प्रसार आणि समृद्धी यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे.

### कोण आहेत लीना मेहेंदळे?

- माजी IAS अधिकारी (1974 बॅच)
- महाराष्ट्राच्या अतिरिक्त मुख्य सचिव पदावरून निवृत्ती
- गोवा राज्याच्या मुख्य माहिती अधिकारी पदाची जबाबदारी
- 500+ लेख, 24 पुस्तके प्रकाशित

# मुंबई शहर जिल्हा युवा पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** मुंबई शहर जिल्ह्यातील युवक, युवती तसेच सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांसाठीच्या जिल्हा युवा पुरस्कारासाठी अर्ज सादर करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. इच्छुकांनी ८ एप्रिल २०२६ पर्यंत आपले प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन मुंबई शहराच्या जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी केले आहे.

आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय स्तरावर विविध क्षेत्रांत युवांनी बजावलेली भूमिका, त्यांचे योगदान आणि समाजविकासातील सहभाग लक्षात घेऊन राज्याच्या युवा धोरणानुसार राज्य व जिल्हास्तरावर हे पुरस्कार दिले जातात. समाजातील दुर्बल घटक, अनुसूचित जाती-जमाती, आदिवासी भाग, शिक्षण, रोजगार, आरोग्य, पर्यावरण, सांस्कृतिक, कला, क्रीडा, मनोरंजन, विज्ञान-तंत्रज्ञान, व्यवसाय, महिला सक्षमीकरण, श्रमप्रतिष्ठा, व्यसनमुक्ती आदी क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या युवक, युवती आणि संस्थांचा या पुरस्काराद्वारे गौरव करण्यात येतो. मुंबई शहर जिल्हा परिक्षेत्रातील संबंधित व्यक्ती आणि संस्थांकडून यापूर्वीही प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्यानुसार २०१९-२० (१ एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०२०), २०२०-२१ (१ एप्रिल २०१८ ते ३१ मार्च २०२१), २०२१-२२ (१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२२), २०२२-२३ (१ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२३), २०२३-२४ (१ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२४) आणि २०२४-२५ या वर्षांसाठीच्या जिल्हा युवा पुरस्कारासाठी प्रस्ताव मागविण्यात आले होते.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### इंदापूरमध्ये साधेपणाने रमजान ईद

**इंदापूर :** इंदापूर तालुक्यात रमजान ईद साधेपणाने साजरी करण्यात आली. यावेळी मुस्लिम समाजाच्या विकासासाठी राज्य सरकारकडून निधीची कमतरता भासू देणार नाही, अशी ग्वाही कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. शनिवारी (दि. 21) दोन्ही ईदगाह मैदानांवर झालेल्या सामूहिक नमाजपठणानंतर ते बोलत होते. कार्यक्रमाला हर्षवर्धन पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे यंदा ईद साधेपणाने साजरी करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. शिरखुर्मा कार्यक्रमांनाही चांगला प्रतिसाद मिळाला.

### उपराष्ट्रपतींच्या दौऱ्यामुळे रस्ते बंद; विद्यार्थ्यांची गैरसोय

**लोणी काळभोर :** देशाचे उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांच्या दौऱ्यानिमित्त रविवारी (ता. २२) पुणे–सोलापूर राष्ट्रीय महामार्गासह उरुळी कांचन व लोणी काळभोर परिसरातील अंतर्गत रस्ते पूर्णपणे बंद करण्यात आले. कडक सुरक्षा व्यवस्थेमुळे वाहतूक विस्कळीत झाली असून, याचा फटका सर्वसामान्य नागरिकांसह हजारो विद्यार्थ्यांना बसला. उरुळी कांचन येथील निसर्गोपचार आश्रमाचा स्थापना दिन आणि पुस्तक प्रकाशन सोहळ्यासाठी उपराष्ट्रपती आले होते. त्याचवेळी लोणी काळभोर येथील एमआयटी शैक्षणिक संकुलात पोलीस भरती परीक्षेसाठी सुमारे ५ हजार विद्यार्थी उपस्थित होते. दोन्ही मोठे कार्यक्रम एकाच दिवशी ठेवल्याने वाहतूक व्यवस्थेचा पूर्णपणे बोजवारा उडाला. सकाळपासून महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्यांची एकाचवेळी गर्दी उसळल्याने बसस्थानकांवर झुंबड उडाली. अनेक विद्यार्थ्यांना बसच्या दरवाज्याला लटकून जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागला.

## खेड तालुक्यात शेतकऱ्यांची झुंबड; आखाती युद्धाचा परिणाम

# गॅसनंतर युरियासाठीही रांगा!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** गॅस सिलिंडर टंचाईनंतर आता युरिया खतासाठीही शेतकऱ्यांना रांगा लावण्याची वेळ आली आहे. खेड तालुका खरेदी विक्री संघाच्या केंद्रात शनिवारी (दि. २१) युरिया खरेदीसाठी शेतकऱ्यांची मोठी गर्दी उसळली. उन्हाच्या तीव्र झळांमध्ये सकाळपासून संध्याकाळपर्यंत रांगेत उभे राहून शेतकरी या टंचाईचा सामना करत असल्याचे चित्र दिसून आले.



**आखाती युद्धामुळे पुरवठा साखळी विस्कळीत**

इस्रायल-इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर नैसर्गिक वायूच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण झाले आहेत. भारतातील युरिया उत्पादन मोठ्या प्रमाणात नैसर्गिक वायूवर अवलंबून आहे. तसेच ओमान, कतार, सौदी अरेबिया यांसारख्या आखाती देशांकडून सुमारे ७५ टक्के युरिया आयात केला जातो. युद्धामुळे होर्मुझ सामुद्रधुनीतील वाहतूक विस्कळीत झाल्याने गॅस व खतांच्या पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. केंद्र सरकारने खत कंपन्यांसाठी गॅस कोटा ७० टक्क्यांवर मर्यादित केल्याने उत्पादन घटले असून, त्याचा थेट फटका शेतकऱ्यांना बसत आहे.

**एकाच ट्रकवर शेकडो शेतकऱ्यांची गर्दी**

खेड तालुक्यातील सहकारी खरेदी विक्री संघात शुक्रवारी रात्री उशिरा सुमारे ३५ टन युरियाचा एक ट्रक दाखल झाला. ही माहिती मिळताच शनिवारी पहाटेपासूनच शेतकऱ्यांनी केंद्रावर गर्दी केली. मर्यादित साठा आणि मोठी मागणी यामुळे लांबच लांब रांगा लागल्या.

अनेक शेतकरी उन्हात उभे राहून तासन्तास प्रतीक्षा करत होते. मात्र सर्वांना खत मिळेलच याची खात्री नसल्याने काहींना रिकाम्या हाताने परतावे लागण्याची शक्यता निर्माण झाली.

**पिकांवर परिणाम होण्याची भीती**

सध्या उन्हाळी हंगामातील भुईमूग, कांदा आणि भाजीपाला पिकांसाठी युरिया अत्यावश्यक आहे. मात्र टंचाईमुळे खत वेळेवर उपलब्ध होत नसल्याने पिकांच्या वाढीवर परिणाम होण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत.

**काही ठिकाणी खासगी**

विक्रेत्यांकडून युरिया जादा दराने विकला जात असल्याच्या तक्रारीही पुढे येत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक ओझे वाढत आहे.

**शेतकऱ्यांचा संतप्त सवाल**

"गॅस टंचाईमुळे घरात सिलेंडर नाही, आणि शेतात युरिया नाही. अशा परिस्थितीत शेती आणि संसार कसा चालवायचा?" असा सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत. वाढती महागाई आणि टंचाईचा दुहेरी फटका ग्रामीण भागातील कामगार वर्गालाही बसत आहे.

**प्रशासनाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह**

केंद्र आणि राज्य सरकारकडून खत साठा पुरेसा असल्याचे सांगितले जात असले, तरी प्रत्यक्षात मात्र टंचाई जाणवत असल्याचे चित्र आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढत आहे.

**पुरवठा सुरळीत करण्याची मागणी**

या संकटातून शेतकऱ्यांना लवकर दिलासा मिळावा, यासाठी खत पुरवठा साखळी मजबूत करणे गरजेचे असल्याची मागणी होत आहे. अन्यथा येणाऱ्या हंगामात उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## मांदळेवाडीत विजेचा लंपडाव कायम; शेतकरी हतबल, पिकांवर संकट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्वेकडील शेवटच्या टोकावर असलेल्या मांदळेवाडी येथे विजेचा लंपडाव कायम सुरू असून, शेतकरी आणि ग्रामस्थ हतबल झाले आहेत. वर्षभरात एखादा महिना वगळता उर्वरित काळात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने शेती आणि दैनंदिन जीवनावर गंभीर परिणाम होत आहे.

मांदळेवाडी ही दुष्काळग्रस्त वाडी म्हणून ओळखली जाते. उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागते. अशा परिस्थितीत शिरूर तालुक्यातील रांजणगाव येथून वीजपुरवठा केला जातो. मात्र रांजणगाव औद्योगिक क्षेत्र असल्याने या भागाला पूर्ण क्षमतेने वीज मिळत नसल्याची तक्रार आहे.

सध्या परिसरातील ओढे-नाले कोरडे पडल्याने विहिरी व विंधन विहिरींची पाणीपातळी घटली आहे. थोडीफार उरलेली पिकेही विजेअभावी वाळण्याच्या मार्गावर आहेत. सततच्या लोडशेडिंगमुळे सिंचनावर परिणाम होऊन शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे.

या भागातील ग्रामस्थांची अनेक वर्षांपासूनची मागणी आहे की, मांदळेवाडीला आंबेगाव तालुक्यातील काठापूर विजकेंद्रातून वीजपुरवठा करण्यात यावा. मात्र या मागणीची अद्याप दखल घेतली गेली नसल्याने नाराजी व्यक्त होत आहे.

वीज कधी येते आणि कधी जाते, याचा ठावठिकाणा नसल्याने शेतकरी संतप्त आहेत. तक्रार केल्यास "वरून बिघाड आहे" असेच ठरलेले उत्तर मिळत असल्याची खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली. तसेच काही ठिकाणी कर्मचाऱ्यांकडून असहकाराची वागणूक मिळत असल्याच्या तक्रारीही आहेत. भारनियमन असल्यास ते नियोजनबद्ध रितीने करावे आणि वीजपुरवठा सुरू असताना पूर्ण दाबाने द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## खेड, आंबेगाव, जुन्नरसाठी ३०० टन युरिया उपलब्ध; शेतकऱ्यांना दिलासा

### कृषिमंत्री दत्तामामा भरणे यांच्या हस्तक्षेपाने निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** खेड, आंबेगाव आणि जुन्नर तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी तब्बल ३०० टन युरिया खत उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती खेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तथा जिल्हा परिषद गटनेते विजयसिंह शिंदे पाटील यांनी दिली. राज्याचे कृषिमंत्री दत्तामामा भरणे यांच्या माध्यमातून हा निर्णय घेण्यात आला असून, यामुळे युरिया टंचाईने त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

**उन्हाळी हंगामासाठी खताची गरज वाढली**

खेड, आंबेगाव आणि जुन्नर तालुक्यांमध्ये धरणांमधील पाण्याच्या उपलब्धतेमुळे उन्हाळी हंगामात मोठ्या प्रमाणावर बागायती शेती केली जाते. विविध आधुनिक तंत्रज्ञानांचा वापर करून शेतकरी प्रयोगशील शेती करत आहेत. त्यामुळे खतांची मागणी वाढली असून, विशेषतः युरिया खताची आवश्यकता मोठ्या प्रमाणात जाणवत आहे.

**अधिवेशनात मांडली मागणी**

शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन विजयसिंह शिंदे पाटील यांनी मागील आठवड्यात अधिवेशनादरम्यान कृषिमंत्री दत्तामामा भरणे यांच्याकडे युरिया उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. यावेळी आमदार बाबाजी काळे हे देखील उपस्थित होते. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने सूचना दिल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला.

**साठेबाजांविरोधात कारवाईची गरज**

काही ठिकाणी साठेबाज व्यापारी युरिया खताचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून शेतकऱ्यांना वेठीस धरत असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासनाने कठोर पावले उचलण्याची गरज असल्याचे मतही यावेळी व्यक्त करण्यात आले.

**मागणीनुसार आणखी पुरवठा**

कृषिमंत्री दत्तामामा भरणे यांनी मागणी वाढेल तसा आणखी युरिया पुरवठा करण्यात येईल, असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे पुढील काळातही शेतकऱ्यांना खताची कमतरता भासणार नाही, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

**शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी प्रत्यक्ष भेट**

दरम्यान, खेड तालुका खरेदी विक्री संघात शनिवारी (दि. २१) युरिया खताचे वितरण सुरू असताना सभापती विजयसिंह शिंदे पाटील यांनी प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांना दिलासा दिला.

## बेल्हा–जेजुरी राज्यमार्गावर अपघातांची मालिका सुरूच; लाखणगावजवळ ट्रक पलटी

### घोडनदी पुलाजवळ भीषण अपघात; सुदैवाने जीवितहानी टळली, मात्र वाहनाचे मोठे नुकसान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** बेल्हा–जेजुरी राज्यमार्गावर अपघातांची मालिका सुरूच असून, लाखणगाव (ता. आंबेगाव) येथे पुन्हा एकदा भीषण अपघात घडला आहे. शुक्रवार (दि. 20) रोजी दुपारी घोडनदीच्या पुलाजवळ टाटा कंपनीचा ट्रक (MH-12, DD-5772) पलटी झाला. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र ट्रकचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.



**वळणावर ब्रेक, नियंत्रण सुटले**

मिळालेल्या माहितीनुसार, हा ट्रक कागदी पुठ्ठा घेऊन बेल्हा मार्गे नाशिककडे जात होता. लाखणगाव परिसरातील वळणावर अचानक ब्रेक दाबल्याने चालकाचे ट्रकवरील नियंत्रण सुटले आणि ट्रक रस्त्यावर पलटी झाला. अपघाताच्या वेळी ट्रकमध्ये फक्त चालकच असल्याने मोठा अनर्थ टळला.

**अपघातप्रवण ठरत आहे हा मार्ग**

बेल्हा–जेजुरी राज्यमार्ग गेल्या काही वर्षांपासून अपघातप्रवण मार्ग म्हणून ओळखला जात आहे. मागील दोन वर्षांत या मार्गावर अनेक अपघात झाले असून, काहींमध्ये जीवितहानीही झाली आहे. वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे या मार्गावरील प्रवास धोकादायक बनत चालला आहे.

**लाखणगाव परिसरात अपघातांची वाढती संख्या**

लाखणगाव परिसरात यापूर्वीही अनेक छोटे-मोठे अपघात घडले आहेत. रस्त्याच्या कडेला वारंवार वाहने उभी असतात, त्यामुळे अवजड वाहनचालकांना मार्ग काढताना मोठी कसरत करावी लागते. यामुळे अपघातांची शक्यता वाढत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

**प्रशासनाकडे उपाययोजनांची मागणी**

या सततच्या अपघातांमुळे स्थानिक ग्रामस्थांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. अपघातांची संख्या कमी करण्यासाठी आरटीओ विभाग, स्थानिक पोलीस आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. रस्त्यावरील अडथळे दूर करणे, वाहतूक नियमन करणे आणि सुरक्षिततेच्या उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले आहे.

## लौकीत बिबट्याचा दुहेरी हल्ला; तरुण जखमी, ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** आंबेगाव तालुक्यातील लौकी येथे शनिवारी (दि. 21) रात्री राणूबाई मंदिर परिसरात बिबट्याने मोटारसायकलवरून घरी जात असलेल्या दोन तरुणांवर हल्ला करून एका तरुणाला जखमी केले. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, बिबट्याला जेरबंद करण्यासाठी वनविभागाने तातडीने पिंजरे लावावेत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.





**मोटारसायकलवर असताना अचानक हल्ला**

लौकी-पाचघरवस्ती येथील पियुष जनार्दन थोरात (वय 21) आणि किरण नवनाथ थोरात (वय 27) हे दोघे मोटारसायकलने आपल्या घरी जात होते. त्यावेळी राणूबाई मंदिर परिसरात बिबट्याने अचानक किरण थोरात यांच्यावर झडप घातली. प्रसंगावधान राखत त्यांनी गाडी वेगाने पुढे नेल्यामुळे मोठा अनर्थ टळला, मात्र या झटापटीत बिबट्याच्या नख्यांमुळे त्यांच्या पाठीला आणि डाव्या हाताला जखमा झाल्या.

**जखमी तरुणावर मंचरमध्ये उपचार**

घटनेनंतर स्थानिक ग्रामस्थांनी तत्काळ किरण थोरात यांना मंचर येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. रत्नाकर थोरात, शंकर थोरात आणि विनोद थोरात यांनी पुढाकार घेऊन मदत केली. सध्या किरण यांच्यावर उपचार सुरू असून, त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे समजते.

**वनविभागाची तातडीची हालचाल**

घटनेची माहिती मिळताच वनरक्षक संपत तांदळे, वनसेवक जालिंदर थोरात तसेच बिबट कृती दलाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी रुग्णालयात जाऊन जखमीची विचारपूस केली तसेच परिसराची पाहणी केली. बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवले जात असल्याचे वनविभागाकडून सांगण्यात आले आहे.

**ग्रामस्थांची पिंजरे लावण्याची मागणी**

या घटनेनंतर परिसरातील ग्रामस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. यापूर्वीही या भागात बिबट्याच्या हल्ल्याच्या घटना घडल्या असल्याने नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना आहे. त्यामुळे बिबट्याला पकडण्यासाठी किमान तीन ते चार ठिकाणी पिंजरे लावावेत, अशी ठाम मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

**सतर्कतेचे आवाहन**

वनविभागाने नागरिकांना रात्रीच्या वेळी विशेष काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. एकटे प्रवास टाळावा, मोबाईल टॉर्चचा वापर करावा आणि बिबट्याच्या हालचाली दिसल्यास तातडीने वनविभागाला माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. या घटनेमुळे पुन्हा एकदा मानवी वस्तीच्या जवळ वाढत्या वन्यजीवांच्या हालचालींचा प्रश्न गंभीर बनला असून, तातडीने उपाययोजना करण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

## खेड बाजार समितीकडून पंचायत समिती पदाधिकाऱ्यांचा सन्मान

### नवनिर्वाचित सभापती-उपसभापतींसह सदस्यांचा गौरव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने खेड पंचायत समितीच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. पंचायत समितीच्या सभापती विद्याताई मोहिते, उपसभापती मंगेश सावंत तसेच सदस्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.




बाजार समितीच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात खेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तथा पुणे जिल्हा परिषदेचे गटनेते विजयसिंह शिंदे आणि उपसभापती क्रांती सोमवंशी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये सदस्य गौरी मुन्हे, सारिका गोगावले, प्रसाद घेनंद, रुपाली कांबळे आणि कविता राक्षे यांचाही समावेश होता.

**मान्यवरांची उपस्थिती**

या कार्यक्रमास बाजार समितीचे संचालक अशोक राक्षे, सयाजी मोहिते, जयसिंग भोगाडे, अनुराग जैद, विठ्ठल वनघरे, सोमनाथ मुंगसे, माणिक गोरे, कैलास लिंभोरे, सागर मुन्हे यांच्यासह सचिव बाळासाहेब धंद्रे, कैलास जफरे, ज्येष्ठ नेते मारुती सातकर, दीपक कांबळे, वैभव राक्षे, राहुल पिंगळे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**विजयसिंह शिंदे यांचाही सत्कार**

यावेळी विशेष म्हणजे, पुणे जिल्हा परिषदेच्या गटनेतेपदी विजयसिंह शिंदे यांची निवड झाल्याबद्दल खेड पंचायत समितीच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात आला. सभापती विद्याताई मोहिते आणि उपसभापती मंगेश सावंत यांनी त्यांचे अभिनंदन करत पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

**सामाजिक उपक्रमाची परंपरा कायम**

कार्यक्रमात बाजार समितीच्या सामाजिक बांधिलकीचेही दर्शन घडले. बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या मासिक सभेला मिळणारे मानधन सामाजिक संस्थांना देण्याची परंपरा कायम ठेवत, यावेळी हे मानधन खेड तालुक्यातील टेमगिरवाडी येथील जिल्हा परिषद शाळेला देण्यात आले.

राष्ट्रीय आणि राज्य स्तरावर निवड झालेल्या या शाळेचे शिक्षक रामकृष्ण वाटेकर यांनी मानधन स्वीकारले. या उपक्रमाचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले. शेतकरी आणि समाजासाठी सकारात्मक योगदान देण्याचा बाजार समितीचा प्रयत्न असल्याचे यावेळी अधोरेखित झाले.

**एकजुटीचा संदेश**

हा कार्यक्रम केवळ सत्कारापुरता मर्यादित न राहता, स्थानिक राजकीय आणि सामाजिक नेत्यांमधील एकजूट आणि सहकार्याचे प्रतीक ठरला. विकासासाठी एकत्र येण्याचा संदेश या निमित्ताने देण्यात आला.

## हिरवी मिरची, टोमॅटो व लसणाचे दर घसरले; पालेभाज्यांची मोठ्या प्रमाणात आवक

# कांद्याच्या आवकेत घट; भाव मात्र स्थिरच, चाकण बाजारात ४.७० कोटींची उलाढाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चाकण :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्डमध्ये रविवारी (दि. २२ मार्च २०२६) शेतीमालाच्या आवक-भावात मोठे चढ-उतार पाहायला मिळाले. कांद्याची आवक लक्षणीय घटली असली, तरी भाव स्थिर राहिले. दुसरीकडे हिरवी मिरची, टोमॅटो आणि लसणाचे दर घसरले असून पालेभाज्यांची मोठ्या प्रमाणात आवक झाली. या व्यवहारातून एकूण ४ कोटी ७० लाख रुपयांची उलाढाल नोंदवण्यात आली.



**कांद्याची आवक घटली**

चाकण बाजारात कांद्याची एकूण आवक ८ हजार क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक तब्बल ४ हजार क्विंटलने कमी झाली आहे. मात्र या घटेचा भावावर कोणताही परिणाम झाला नाही. कांद्याचा कमाल भाव १,४०० रुपये, तर सरासरी १,२०० रुपये आणि किमान ८०० रुपये दराने व्यवहार झाले.

बटाट्याची आवक १,४०० क्विंटल इतकी स्थिर राहिली असून, त्याचे दरही १,२०० रुपये कमाल, १,००० रुपये सरासरी आणि ८०० रुपये किमान या पातळीवर कायम राहिले.

**लसणाचे दर स्थिर; मिरची-टोमॅटोचे दर कोसळले**

लसणाची आवक ५० क्विंटल इतकी मर्यादित राहूनही त्याचा कमाल भाव १२ हजार रुपयांवर स्थिरावला. मात्र हिरव्या मिरचीची ३१० क्विंटल इतकी आवक झाल्याने दरात घसरण झाली. मिरचीला ५,००० ते ७,००० रुपये दर मिळाला.

टोमॅटो बाजारातही घसरण पाहायला मिळाली. ३०८ क्विंटल आवक झालेल्या टोमॅटोला १,००० ते १,५०० रुपये दर मिळाला. त्यामुळे शेतकऱ्यांना अपेक्षित दर मिळण्यात अडचणी आल्याचे चित्र दिसून आले.

**फळभाज्यांची मोठी आवक**

फळभाज्यांच्या बाजारात विविध भाज्यांची मोठ्या प्रमाणात आवक झाली. कोबी (२३५ क्विंटल) ५०० ते ७०० रुपये, फ्लॉवर (२१५ क्विंटल) ६०० ते १,२०० रुपये, वांगी (९५ क्विंटल) १,५०० ते २,५०० रुपये, भेंडी (१०२ क्विंटल) २,००० ते ४,००० रुपये दराने विकली गेली.

दोडका (६२ क्विंटल) २,००० ते ३,००० रुपये, कारली (७२ क्विंटल) २,००० ते ३,००० रुपये, दुधीभोपळा (६३ क्विंटल) १,००० ते १,५०० रुपये, काकडी (१२० क्विंटल) ८०० ते १,२०० रुपये दराने विकली गेली.

ढोबळी मिरची (१२२ क्विंटल) ४,००० ते ५,००० रुपये, गवार (५० क्विंटल) ५,००० ते ७,००० रुपये, आले (१३० क्विंटल) ३,००० ते ४,५०० रुपये, तसेच वाटाणा, शेवगा, गाजर यांनाही चांगला प्रतिसाद मिळाला.

**पालेभाज्यांचा बाजार तेजीत**

चाकण बाजारात पालेभाज्यांची मोठ्या प्रमाणात आवक झाली. मेथीच्या १९ हजार ५९० जुड्या बाजारात आल्या असून, त्यांना ४०० ते ७०० रुपये दर मिळाला. कोथिंबीरच्या २४ हजार १७० जुड्यांना ३०० ते ७०० रुपये, शेपूच्या २,०५० जुड्यांना ६०० ते १,००० रुपये आणि पालकाच्या २,५४० जुड्यांना ३०० ते ६०० रुपये दर मिळाला. पालेभाज्यांच्या या मोठ्या आवकेमुळे ग्राहकांना ताज्या भाज्या उपलब्ध झाल्या, तर शेतकऱ्यांना सरासरी दर मिळाले.

**जनावरांच्या बाजारातही उलाढाल**

चाकण येथील जनावरांच्या बाजारातही चांगली उलाढाल झाली. ३० जर्सी गाईंमधून १८ गाईंची विक्री झाली असून, त्यांना १५,००० ते ७०,००० रुपये दर मिळाला. ६५ बैलांपैकी ३८ बैल विकले गेले, ज्यांना १०,००० ते ४०,००० रुपये दर मिळाला. तसेच ८५ म्हशींपैकी ६५ म्हशींची विक्री झाली असून, त्यांना ३०,००० ते ८०,००० रुपये दर मिळाले. शेळ्या-मेंढ्यांच्या बाजारात ५,५१० जनावरांपैकी ४,८३० जनावरांची विक्री झाली. त्यांना २,००० ते १५,००० रुपये दर मिळाले.

**शेतकरी, व्यापाऱ्यांची मिश्र प्रतिक्रिया**

कांद्याचे भाव स्थिर राहिल्यामुळे शेतकऱ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळाला असला, तरी हिरवी मिरची, टोमॅटो आणि काही फळभाज्यांच्या दरातील घसरणीमुळे नाराजी व्यक्त होत आहे. दुसरीकडे, ग्राहकांना मात्र दरात झालेल्या घसरणीचा फायदा होत आहे.

## सारांश वृत्त

### सेल्फीतून विरोध, जॉर्जिया मेलोनींची शांत प्रतिक्रिया

**रोम :** इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी पुन्हा एकदा चर्चेत आल्या आहेत. एका तरुणाने त्यांच्यासोबत सेल्फी घेताना त्यांच्या महत्त्वाच्या निर्णयाविरोधात प्रतिक्रिया व्यक्त केली. अनपेक्षित प्रसंग असूनही मेलोनी यांनी संयम राखत शांतपणे उत्तर दिले. त्यांच्या या संतुलित आणि आत्मविश्वासपूर्ण प्रतिक्रियेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे. त्यांच्या रोखठोक पण संयमी शैलीचे अनेकांनी कौतुक केले असून, नेतृत्वातील स्थैर्य आणि संवाद कौशल्याचे हे उदाहरण मानले जात आहे.

### घरून काम नाकारले; गर्भवती महिलेने गमावले बाळ

**ओहायो :** धकाधकीच्या जीवनात काम आणि आरोग्य यांचा समतोल राखणे आव्हानात्मक ठरत असताना एका धक्कादायक घटनेने लक्ष वेधले आहे. ओहायो येथील एका गर्भवती महिलेला गुंतागुंतीच्या गर्भधारणेदरम्यान घरून काम (वर्क फ्रॉम होम) करण्याची परवानगी कंपनीकडून नाकारण्यात आली. कामाच्या ताणामुळे आणि योग्य विश्रांती न मिळाल्याने तिच्या प्रकृतीवर विपरीत परिणाम झाला. परिणामी, तिला नवजात बाळ गमवावे लागल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे कार्यस्थळी गर्भवती महिलांसाठी संवेदनशील धोरणांची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे.

### शेअर बाजारात तेजी कायम; सेन्सेक्स-निफ्टीत वाढ

**मुंबई :** देशांतर्गत शेअर बाजारात आज सुरुवातीच्या चढ-उतारांनंतरही तेजीचा कल कायम राहिला. सकाळी १० वाजेपर्यंत BSE Sensex आणि Nifty 50 दोन्ही निर्देशांक सुमारे ०.४७ टक्क्यांनी वधारले. टीसीएस, इन्फोसिस आणि विप्रो सारख्या आयटी शेअर्समध्ये वाढ दिसली. एकूण २,७०८ शेअर्सपैकी २,३३१ शेअर्स वाढले, तर ३७७ घसरले. गुंतवणूकदारांचा सकारात्मक कल बाजारात टिकून असल्याचे चित्र आहे.

## कच्च्या तेलाच्या पुरवठ्यावर नकार, उर्जासंकट गडद

# इराणचा भारताला मोठा धक्का!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** मध्यपूर्वेतील वाढत्या तणावामुळे जागतिक ऊर्जा व्यवस्थेवर गंभीर परिणाम होत असून, या पार्श्वभूमीवर इराणने भारताला मोठा धक्का दिला आहे. होर्मुझ सामुद्रधुनी बंद केल्यानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीत भारताने इराणकडून कच्च्या तेलाची खरेदी करण्याची तयारी दर्शवली होती. मात्र इराणने “आंतरराष्ट्रीय बाजारासाठी आमच्याकडे अतिरिक्त कच्चे तेल उपलब्ध नाही,” असे स्पष्ट करत भारतासह इतर देशांना पुरवठा करण्यास नकार दिला आहे.

होर्मुझ सामुद्रधुनी ही जगातील सर्वात महत्त्वाच्या जलमार्गांपैकी एक मानली जाते. या मार्गातून जागतिक स्तरावर सुमारे २० टक्के कच्चे तेल आणि नैसर्गिक वायूची वाहतूक होते. त्यामुळे या मार्गावरील निर्बंध किंवा बंदीचा थेट परिणाम संपूर्ण जगावर होतो. सध्या या सामुद्रधुनीतून तेलवाहू जहाजांची वाहतूक ठप्प झाल्याने अनेक जहाजे अडकून पडली असून, जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे.

भारतासारख्या आयात-आधारित देशासाठी ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक ठरत आहे. भारत आपल्या गरजेपैकी जवळपास ९० टक्के कच्चे तेल परदेशातून आयात करतो. त्यामुळे पुरवठा खंडित झाल्यास देशातील इंधन दर वाढ, महागाई आणि औद्योगिक उत्पादनावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. आधीच काही भागांमध्ये गॅस सिलिंडरचा पुरवठा विस्कळीत झाल्याने हॉटेल आणि लघुउद्योगांवर परिणाम दिसून येत आहे.

या संकटावर मात करण्यासाठी भारताने पर्यायी स्रोतांकडे वळण्यास सुरुवात केली आहे. विशेषतः रशियाकडून कच्च्या तेलाची आयात वाढवण्यात येत आहे. याशिवाय इतर तेल उत्पादक देशांशीही संपर्क साधून पुरवठा सुरळीत ठेवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. तथापि, जागतिक स्तरावरील तणाव आणि मर्यादित उपलब्धता यामुळे हे प्रयत्न कितपत यशस्वी ठरतील, याबाबत अनिश्चितता कायम आहे.

दरम्यान, अमेरिकेने कच्च्या तेलाच्या किमती नियंत्रणात ठेवण्यासाठी काही प्रमाणात सवलती देण्याचा प्रस्ताव मांडला होता. त्यानुसार इराणला ३० दिवसांसाठी तेल विक्रीची मुभा देण्याचा विचार पुढे आला. या निर्णयामुळे जागतिक बाजारात स्थैर्य येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. मात्र इराणनेच अतिरिक्त तेल उपलब्ध नसल्याचे सांगितल्याने या प्रयत्नांनाही धक्का बसला आहे.

इराणच्या या भूमिकेमुळे भारत-इराण संबंधांवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पारंपरिकरित्या मैत्रीपूर्ण संबंध असलेल्या इराणकडून अपेक्षित सहकार्य न मिळाल्याने भारताला नव्या धोरणात्मक पावले उचलावी लागणार आहेत.

**जागतिक पुरवठा विस्कळीत; भारत पर्यायांच्या शोधात**

- भारताला बसलेला इराणचा धक्का
- इराणने अतिरिक्त कच्चे तेल उपल्ध नसल्याचे सांगत पुरवठा नाकारला
- होर्मुझ सामुद्रधुनी बंदीमुळे जागतिक तेल वाहतूक विस्कळीत
- भारताच्या गरजेपैकी सुमारे ९०% कच्चे तेल आयातीवर अवलंबून
- गॅस सिलिंडर व इंधन पुरवठ्यावर परिणाम जाणवू लागला
- भारताने रशियाकडून आयात वाढवून पर्याय शोधण्यास सुरुवात

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ऐतिहासिक विक्रम

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय राजकारणात आणखी एक ऐतिहासिक टप्पा गाठत सर्वाधिक काळ निवडून आलेले सरकारप्रमुख राहण्याचा विक्रम आपल्या नावावर केला आहे. गुजरातचे मुख्यमंत्री आणि भारताचे पंतप्रधान या दोन्ही पदांचा एकत्रित कार्यकाळ धरल्यास त्यांनी तब्बल ८,९३१ दिवस पूर्ण केले असून, याआधीचा विक्रम सिक्कीमचे माजी मुख्यमंत्री पवन कुमार चामलिंग यांच्या नावावर होता.

मोदी यांनी ७ ऑक्टोबर २००१ रोजी गुजरातच्या मुख्यमंत्रीपदाची सूत्रे हाती घेतली आणि २१ मे २०१४ पर्यंत तब्बल १३ वर्षांहून अधिक काळ राज्याचे नेतृत्व केले. त्यानंतर २६ मे २०१४ रोजी त्यांनी देशाचे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. २०१४, २०१९ आणि २०२४ या तीन लोकसभा निवडणुकांमध्ये सलग विजय मिळवत त्यांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे नेतृत्व कायम ठेवले आहे.

या विक्रमाबद्दल देशभरातून मोदी यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी हा विक्रम सेवा, समर्पण आणि जनविश्वासाचे प्रतीक असल्याचे म्हटले आहे. तर संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी मोदी यांच्या सातत्यपूर्ण कार्यशैलीमुळे देशात मोठे परिवर्तन घडल्याचे नमूद केले.

दरम्यान, मोदी हे केवळ राजकारणातच नव्हे तर सोशल मीडियावरही प्रभावी नेते ठरले आहेत. २०२६ च्या सुरुवातीला त्यांनी इंस्टाग्रामवर १० कोटी फॉलोअर्सचा टप्पा पार करत जगातील पहिला नेता म्हणून नवा विक्रम प्रस्थापित केला.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी 23 मार्च रोजी साधणार देशाशी संवाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** ‘व्हॉट इंडिया थिंक्स टुडे समिट 2026’ (WITT) मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी हे 23 मार्च रोजी प्रमुख पाहुणे म्हणून सहभागी होणार आहेत. सलग तिसऱ्यांदा या प्रतिष्ठित मंचावर उपस्थित राहून ते विकसित भारत, जागतिक संबंध आणि देशाच्या भविष्याविषयी महत्त्वपूर्ण विचार मांडणार आहेत.

23 व 24 मार्चदरम्यान होणाऱ्या या समिटमध्ये देश-विदेशातील धोरणकर्ते, तज्ज्ञ आणि उद्योग क्षेत्रातील दिग्गज एकत्र येणार आहेत. भारताची ऊर्जा धोरणे, पायाभूत सुविधा विकास आणि औद्योगिक प्रगती यावर सखोल चर्चा होणार असून, देशाच्या पुढील वाटचालीची दिशा ठरवण्याचा प्रयत्न या मंचावर होईल. या परिषदेत केंद्रीय मंत्री पीयूष गोयल, ज्योतिरादित्य सिंधिया आणि अश्विनी वैष्णव यांच्यासह विविध राज्यांचे मुख्यमंत्री सहभागी होणार आहेत. तसेच विरोधी पक्षातील अखिलेश यादव आणि असदुद्दीन ओवेसी यांची उपस्थिती या मंचाच्या निष्पक्षतेचे प्रतीक मानली जात आहे. कॉर्पोरेट क्षेत्रातून जॅक्सन समूहाचे संचालक समीर गुप्ता आणि जॅक्सन ग्रीनचे सीईओ बिकेश ओगरा सहभागी होणार असून, स्वच्छ ऊर्जा आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील धोरणात्मक चर्चेला ते दिशा देणार आहेत. ऊर्जा संक्रमणाच्या प्रक्रियेत भारताची भूमिका अधिक मजबूत करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवरही चर्चा अपेक्षित आहे. ‘व्हॉट इंडिया थिंक्स टुडे’ समिट हे देशातील प्रभावशाली वार्षिक व्यासपीठ बनत असून, यावर्षीच्या संमेलनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

## पाकिस्तानमध्ये लष्कर-ए-तैयबाच्या कमांडरची हत्या!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** पाकिस्तानमध्ये दहशतवादी संघटना लष्कर-ए-तैयबाशी संबंधित कमांडर बिलाल आरिफ सलाफी याची भररस्त्यात हत्या करण्यात आल्याने मोठी खळबळ उडाली आहे. शनिवारी ईदची नमाज अदा करून परतत असताना त्याच्यावर अज्ञात हल्लेखोरांनी आधी चाकूने हल्ला केला आणि त्यानंतर गोळीबार केला. या दुहेरी हल्ल्यात सलाफीचा जागीच मृत्यू झाला.

ही घटना पाकिस्तानातील मुरीदके परिसरात घडली, जो लष्कर-ए-तैयबाचा प्रमुख केंद्र मानला जातो. याच ठिकाणी या संघटनेचे मुख्यालय होते. काही काळापूर्वी येथे झालेल्या हल्ल्यांमध्ये हे केंद्र मोठ्या प्रमाणावर उद्ध्वस्त झाले होते. त्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा या परिसरात हिंसक घटना घडल्याने सुरक्षेच्या प्रश्नांवर चर्चा सुरू झाली आहे.

प्राथमिक माहितीनुसार, हल्ल्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र काही सूत्रांच्या मते, कौटुंबिक वादातून ही हत्या झाली असावी. या प्रकरणात संशयितांना ताब्यात घेण्यात आले असून, पुढील तपास सुरू आहे.

सलाफी हा संघटनेत सक्रिय असून तरुणांची भरती आणि त्यांचे ब्रेनवॉश करण्याची जबाबदारी त्याच्याकडे होती, असे सांगितले जाते. त्यामुळे त्याचा प्रभाव संघटनेत मोठा मानला जात होता.

दरम्यान, पाकिस्तानमध्ये दहशतवादी कारवायांमध्ये वाढ होत असल्याचे चित्र दिसत आहे. अशा घटनांमुळे देशाच्या अंतर्गत सुरक्षेवर गंभीर प्रश्न निर्माण होत आहेत. जागतिक स्तरावरही पाकिस्तानच्या दहशतवादविरोधी धोरणावर टीका होत असून, अशा घटनांमुळे त्यात आणखी भर पडत आहे.

## भेसळयुक्त दुधामुळे 16 जणांचा मृत्यू; आंध्रप्रदेशात खळबळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**अमरावती :** आंध्रप्रदेशातील गोदावरी जिल्ह्यात भेसळयुक्त दूध पिल्यामुळे 16 जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, आणखी तिघांची प्रकृती चिंताजनक असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

लालाचेरुवु, चौदेस्वरनगर आणि स्वरूपनगर या भागांमध्ये फेब्रुवारीपासून भेसळयुक्त दूध विकले जात होते. दूध पिल्यानंतर नागरिकांना मळमळ, उलटी, पोटदुखी, लघवी बंद होणे आणि मूत्रपिंड निकामी होणे अशा गंभीर लक्षणांचा सामना करावा लागला. 22 फेब्रुवारीपासून तक्रारी समोर येऊ लागल्यानंतर तपासात एका डेअरीमधून हे दूध पुरवले जात असल्याचे उघड झाले. या दुधात एथिलीन ग्लायकॉल या विषारी रसायनाची भेसळ केल्याचे समोर आले आहे. या घटनेत 20 हून अधिक जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, काहींना डायलॅसिस व व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले आहे. संबंधित डेअरीमधून 100 हून अधिक कुटुंबांना दूध पुरवले जात होते. या प्रकरणी चौकशी सुरू असून, दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## मध्यपूर्वेतील संघर्षात नवे वळण; जागतिक राजकारण तापले

## रशियाचा अमेरिकेवर गंभीर आरोप; ‘ऊर्जा बाजारावर वर्चस्वासाठी युद्धाचा खेळ’!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** मध्यपूर्वेतील सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर रशियाने अमेरिकेविरोधात गंभीर आरोप करत जागतिक पातळीवर खळबळ उडवली आहे. रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्गेई लावरोव यांनी अमेरिकेवर ऊर्जा बाजारावर वर्चस्व मिळवण्यासाठी युद्धजन्य परिस्थितीचा वापर केल्याचा आरोप केला आहे.

इराण, इस्रायल आणि अमेरिकेमधील संघर्षाला आता २० पेक्षा अधिक दिवस उलटले असून, परिस्थिती दिवसेंदिवस अधिकच चिघळत आहे. या संघर्षात चीन आणि रशिया उघडपणे इराणच्या बाजूने उभे असल्याचे दिसत आहे. विशेषतः इराणच्या अणू केंद्रांवर झालेल्या हल्ल्यानंतर रशियाने आक्रमक भूमिका घेतली आहे.

एका मुलाखतीत बोलताना लावरोव म्हणाले की, अमेरिकेचे मुख्य उद्दिष्ट जागतिक ऊर्जा संसाधनांवर नियंत्रण मिळवणे आहे. “अमेरिका स्वतःच्या फायद्यासाठी कोणत्याही थराला जाऊ शकते. आवश्यक वाटल्यास एखाद्या देशाची सत्ता उलथवून लावण्यासही ती मागेपुढे पाहत नाही,” असा गंभीर आरोप त्यांनी केला.

**अमेरिकेला इशारा**

लावरोव यांनी पुढे स्पष्ट केले की, आंतरराष्ट्रीय करार करताना अमेरिका केवळ स्वतःच्या हिताचा विचार करते. भविष्यात रशियासोबत संबंध ठेवायचे असतील, तर अमेरिकेला रशियाची बाजूही ऐकावी लागेल, असा इशाराही त्यांनी दिला.

**जागतिक परिणामांची भीती**

मध्यपूर्वेतील या संघर्षामुळे आधीच अनेक देशांमध्ये इंधन टंचाई जाणवत आहे. होर्मुझ सामुद्रधुनीवरील तणावामुळे तेलपुरवठा विस्कळीत झाला असून, जागतिक बाजारपेठेत अस्थिरता वाढली आहे.

रशियाच्या या आरोपांमुळे अमेरिका-रशिया तणाव आणखी वाढण्याची शक्यता असून, या संघर्षाचे परिणाम संपूर्ण जगावर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## पाकिस्तान अव्वल; दहशतवादाचा वाढता विळखा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** जगभरातील दहशतवादी परिस्थितीचा आढावा घेणाऱ्या Global Terrorism Index 2026 अहवालात पाकिस्तानला सर्वाधिक दहशतवादग्रस्त देश म्हणून घोषित करण्यात आले आहे. या यादीत पाकिस्तानने बुर्किनो फासो, नायजर, नायजेरिया आणि माली यांसारख्या देशांना मागे टाकत पहिला क्रमांक मिळवला आहे. वाढत्या दहशतवादी घटनांमुळे आणि अंतर्गत अस्थिरतेमुळे पाकिस्तानसमोर गंभीर आव्हान उभे राहिले आहे. अहवालानुसार, 1 जानेवारी ते 22 मार्च 2026 या कालावधीत पाकिस्तानमध्ये 245 हून अधिक दहशतवादी घटना नोंदवल्या गेल्या आहेत. विशेष म्हणजे या आकडेवारीत ड्युरंड लाईन आणि अफगाणिस्तान सीमेवरील संघर्षांचा समावेश नाही. यावरून देशाच्या अंतर्गत भागातच दहशतवादाचे प्रमाण वाढत असल्याचे स्पष्ट होते. पोलिस ठाणे, रेल्वे आणि सार्वजनिक ठिकाणांवरही हल्ले झाल्याची नोंद आहे. या हल्ल्यांमध्ये आतापर्यंत 270 हून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला असून, 410 पेक्षा जास्त सुरक्षा दलातील जवानांनी प्राण गमावले आहेत. या घटनांमध्ये दहशतवादी संघटनांसोबतच अफगाण तालिबान आणि बलूच उग्रवादी गट सक्रिय असल्याचेही समोर आले आहे. तज्ज्ञांच्या मते, ही परिस्थिती अशीच राहिल्यास 2026 अखेरीस 1600 ते 1700 सुरक्षा कर्मचाऱ्यांचा मृत्यू होण्याची शक्यता आहे. दरम्यान, वाढत्या दहशतवादासोबतच प्रादेशिक तणाव, विशेषतः इराणसंबंधित परिस्थितीवरही पाकिस्तान सरकार लक्ष ठेवून आहे. एकूणच, अंतर्गत अस्थिरता आणि दहशतवादाचा वाढता विळखा पाकिस्तानसाठी गंभीर संकट ठरत असून, वेळेत ठोस उपाययोजना करणे अत्यावश्यक ठरले आहे.

## एफबीआयचे माजी प्रमुख रॉबर्ट म्यूलर यांचे निधन

**वॉशिंग्टन :** अमेरिकेतील २०१६ च्या राष्ट्राध्यक्षीय निवडणुकीतील रशियन हस्तक्षेपाची चौकशी करणारे आणि त्याचा सविस्तर अहवाल तयार करणारे एफबीआयचे माजी प्रमुख रॉबर्ट म्यूलर यांचे वयाच्या ८१व्या वर्षी निधन झाले. आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्थांनी शनिवारी ही माहिती दिली. म्यूलर यांनी विशेष वकील म्हणून काम करताना संवेदनशील तपास पार पाडला होता. त्यांच्या नेतृत्वाखालील चौकशी अहवाल जागतिक पातळीवर चर्चेत राहिला होता.

## इराणविरोधात G7 देश एकवटले; ट्रम्पचा 48 तासांचा अल्टिमेटम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तेहरान :** इराण, अमेरिका आणि इस्रायलमधील युद्धाचा आज 23 वा दिवस असून मध्यपूर्वेतील परिस्थिती अत्यंत गंभीर बनली आहे. या संघर्षादरम्यान इराणने होर्मुझ सामुद्रधुनी शत्रू राष्ट्रांसाठी बंद केल्याने जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला आहे. अनेक देशांमध्ये इंधनटंचाईचे संकट निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला थेट इशारा देत 48 तासांत सामुद्रधुनी खुली न केल्यास कठोर लष्करी कारवाई करण्याचा अल्टिमेटम दिला आहे. त्यामुळे युद्धाचा तणाव आणखी वाढला आहे.

दरम्यान G7 देशांनीही इराणविरोधात एकत्रित भूमिका घेतली आहे.

कॅनडा, फ्रान्स, जर्मनी, इटली, जपान, ब्रिटन आणि अमेरिका या देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांनी संयुक्त निवेदन जारी करत इराणच्या हल्ल्यांचा निषेध केला आहे.

इराणने आखाती देशांमधील अमेरिकन तळांवर हल्ले केल्याच्या पार्श्वभूमीवर G7 देशांनी संबंधित देशांना पाठिंबा जाहीर केला आहे. तसेच इराणला तणाव कमी करण्याचा इशारा दिला आहे.

या सर्व घडामोडींमुळे मध्यपूर्वेतील तणाव शिगेला पोहोचला असून, पुढील काही दिवसांत परिस्थिती आणखी चिघळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## मध्य पूर्वेतील तणावात ब्रिटनची मोठी हालचाल

# अणुऊर्जेवर चालणारी पाणबुडी अरब सागरात तैनात!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लंडन :** मध्य पूर्वेत सुरू असलेल्या इराण-अमेरिका-इस्रायल संघर्षाने तिसऱ्या आठवड्यात प्रवेश केला असताना ब्रिटनने महत्त्वाची लष्करी हालचाल करत अणुऊर्जेवर चालणारी ‘एचएमएस एन्सन’ ही अत्याधुनिक पाणबुडी अरब सागरात तैनात केली आहे. या पाणबुडीची तैनाती हा वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर घेतलेला महत्त्वपूर्ण धोरणात्मक निर्णय मानला जात आहे.

लष्करी सूत्रांच्या माहितीनुसार, ‘एचएमएस एन्सन’ ही पाणबुडी या महिन्याच्या सुरुवातीला ऑस्ट्रेलियातील पर्थ येथून रवाना झाली होती. सुमारे ५,५०० मैलांचा प्रवास करून ती अरब सागराच्या उत्तरेकडील खोल पाण्यात पोहोचली आहे. एस्ट्यूट-क्लासमधील ही पाचवी पाणबुडी असून ब्रिटनच्या सर्वात आधुनिक आणि शक्तिशाली आक्रमक पाणबुड्यांपैकी एक मानली जाते. या पाणबुडीमध्ये टॉमहॉक ब्लॉक-IV क्रूझ क्षेपणास्त्रे आणि स्पीअरफिश हेवीवेट टॉरपीडो बसवण्यात आले आहेत. या क्षेपणास्त्रांची मारक क्षमता सुमारे १,६०० किलोमीटर असून त्यामुळे दूरवरच्या लक्ष्यांवर अचूक हल्ला करणे शक्य आहे. त्यामुळे इराणमधील महत्त्वाच्या ठिकाणांवर हल्ला करण्याची क्षमता या पाणबुडीकडे असल्याचे मानले जाते.

ही तैनाती अशा वेळी करण्यात आली आहे, जेव्हा इराणने होर्मुज सामुद्रधुनीवरील जहाजवाहतुकीवर निर्बंध आणले आहेत. या कारवाईमुळे जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला असून अनेक देशांनी याचा निषेध केला आहे. ब्रिटनसह २२ देशांनी इराणच्या भूमिकेविरोधात संयुक्त भूमिका घेतली आहे.

दरम्यान, ब्रिटिश सरकारने अमेरिकेला इराणविरोधातील संभाव्य कारवाईसाठी ब्रिटिश लष्करी तळांचा वापर करण्याची परवानगी दिली असल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ‘एचएमएस एन्सन’ ही पाणबुडी दर २४ तासांनी पृष्ठभागावर येऊन लंडनमधील परमनंट जॉइंट हेडक्वार्टर्सशी संपर्क साधत आहे. कोणत्याही प्रकारच्या लष्करी कारवाईसाठी अंतिम आदेश ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांच्या मंजुरीनंतरच दिला जाणार आहे.

मध्य पूर्वेतील वाढता तणाव, होर्मुज सामुद्रधुनीवरील नियंत्रण आणि मोठ्या शक्तींमधील वाढती हालचाल यामुळे परिस्थिती अधिकच गंभीर बनत आहे. या पार्श्वभूमीवर येणारे काही दिवस जागतिक राजकारणासाठी निर्णायक ठरणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.